शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांचा पुरस्कार करणारे साप्ताहिक

# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

आम्ही भिडे
नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान
(खाजगी वितरण)
अंक २३ वा एप्रिल २०१५
त्रैमासिक क्र. १
Website : www.bhidekul.in
Email : office@bhidekul.in

वर्ष : 44 अंक : 4 फोन 0231-2540427 कोल्हापूर ता. 9 एप्रिल 2015 किंमत 2 रुपये Reg. No. GR/RNP/KLP 136/15-17 Posted in Kolhapur RMS

# २०१५ संगमेश्वर कुलसंमेलन

दि. १७ व १८ जानेवारी २०१५ रोजी संगमेश्वर, माभळे येथे भिडे कुलसंमेलन सुमारे २५० ते ३०० भिडे कुलोत्पन्नांच्या उपस्थितीत उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाले. संमेलनाचे उद्घाटन माधवबाग संस्थेच्या संचालिका डॉ. सौ. मधुरा भिडे यांनी केले.

कार्यक्रमाची सुरुवात गणेश वंदना आणि शांतीपाठाने झाली. भिडे परिवारातील निधन झालेल्या ज्ञात, अज्ञातांना आदरांजली वाहिली. श्री. प्रभाकरपंत भिडे ह्यांनी प्रास्ताविक केल्यानंतर संमेलन अध्यक्षांची ओळख करून देऊन त्यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. श्री. चिंतामणी भिडे यांनी प्रतिष्ठानचे कार्य आणि वाटचाल ह्यासंबंधी विवेचन केले. प्रतिष्ठानकडून दरवर्षी संमेलनात कला, साहस, आपली सून, माझी आई, उद्योजक पुरस्कार दिले जातात. त्यांचे स्वरूप व कशासाठी दिले जातात ह्याबद्दल श्री. कुमार भिडे ह्यांनी सांगितले. भिडे प्रतिष्ठान महिला समितीच्या सदस्या सौ. प्रिया भिडे ह्यांनी प्रतिष्ठानमध्ये महिलांचा सहभाग, उपक्रम आणि कार्यक्रम ह्याबद्दल माहिती दिली. ह्या संमेलनापासून नव्याने सुरू झालेला ''आदर्श कार्यकर्ता'' आणि इ. १० वी, १२ वी विद्यार्थिनींसाठी पुरस्कृत केलेला एक पुरस्कार अशा दोन्ही पुरस्काराबद्दल तसेच प्रतिष्ठानकडून शैक्षणिक व वैद्यकीय मदत निधीचा उपयोग कसा केला जातो, ह्याबद्दल दिलीप भिडे ह्यांनी सांगितले. माभळे, भिडे वाडीतील एक ज्येष्ठ सदस्य आणि प्रतिष्ठानचे सक्रिय मार्गदर्शक ॲड. मुकुंदराव भिडे ह्यांनी माभळे गाव आणि त्या अनुषंगाने अनुभव व आठवणी सांगितल्या. माभळे गाव आणि कोकण परिसर ह्याबद्दल श्री. प्रसाद भिडे यांनी ओळख करून दिली. माभळे येथे अनेक वर्षे पारंपारिक पद्धतीने सुरू असलेला आषाढी उत्सव दरवर्षी कसा साजरा होतो ह्याचे प्रत्यक्ष दर्शन माभळे स्थित भिडे मंडळींनी ह्या एक तासाच्या कार्यक्रमात दाखविले.

त्यानंतर सौ. तृप्ती कवठेकर (भिडे) यांनी ''वऱ्हाड निघालंय लंडनला'' ह्या एकपात्री प्रयोगामधील एक भाग आपल्या कलेतून सादर केला. रत्नागिरीच्या सौ. मिताली भिडे व त्यांच्या शिष्यांनी कथ्थक नाट्यविष्कार सादर करून प्रेक्षकांची दाद मिळविली. त्यांनतर सर्वांनी कोकणातील खास जेवणाचा आस्वाद घेतला. रात्रीचे भोजन झाल्यानंतर कोकणामध्ये प्रसिद्ध असलेल्या खेळे, जाखडे, नमन ह्या पारंपारिक कलांपैकी 'नमन' हा दीड तासांचा कार्यक्रम सादर झाला.

यावर्षी कार्यक्रमांची रेलचेल असल्यामुळे दुसऱ्या दिवशी सकाळी ९ वाजताच सौ. स्मिता फडके ह्या माहेरवाशीणीने सादर केलेल्या अर्ध्या तासाच्या चुटके, उखाणे, विनोद ह्या छोट्याशा कार्यक्रमाने उत्साहात सुरुवात झाली. त्यानंतर 'आम्ही भिडे' २२ व्या अंकाचे प्रकाशन संमेलनाध्यक्षांच्या हस्ते झाले. श्री. प्रभाकरपंत व दिलीप भिडे ह्यांनी अंकामधील प्रमुख बाबी सांगितल्या. भिडे




परिवारातील आणि चिपळूण स्थित मार्गदर्शक श्री. श्रीरामभाऊ भिडे ह्यांनी बहुमोल मार्गदर्शन करून प्रतिष्ठानला सर्वोतोपरी सहाय्य करण्याचे आश्वासन देऊन पुढील वर्षी, शक्य असेल तर संमेलन चिपळूणमध्ये घेतले तर पुन्हा आम्ही सक्रिय होऊ असे सांगितले. इ. ४ थी ते १२ वी पर्यंतच्या गुणवान विद्यार्थी/ विद्यार्थिनींचा कौतुक सोहळा आणि ज्येष्ठ भिडे कुलोत्पन्नाचा सन्मान करण्यात आला. तसेच प्रतिष्ठानचा 'कला पुरस्कार' सौ. सुमती भिडे, पुणे यांना तर 'साहस पुरस्कार' माभळ्याचे श्री. प्रभाकर भिडे यांना, तर 'आपली सून पुरस्कार' देवरुखच्या सौ. दिप्ती भिडे यांना व 'माझी आई पुरस्कार' माभळे गावच्या ज्येष्ठ भिडे भगिनी श्रीमती मंगलाताई भिडे यांना व 'उद्योजक पुरस्कार' माभळ्याचे श्री. आशिष भिडे यांना प्रदान करण्यात आले आणि यंदापासून नव्याने सुरू झालेला 'आदर्श कार्यकर्ता' पुरस्कार प्रतिष्ठानचे सक्रिय कार्यकर्ते व कोषाध्यक्ष श्री. चिंतामणी भिडे, ठाणे यांना देण्यात आला.

सांगलीच्या मेजर (नि.) डॉ. वासंतीताई भिडे ह्यांची 'भिडे वटवृक्ष' आणि '१९४८ टर्निंग पॉईंट' ही नुकतीच प्रकाशित झालेली पुस्तके संगमेश्वर कुल संमेलनात सर्वांना भेट देण्यात आली.

प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्री. मा. चिं. भिडे आणि संमेलनाध्यक्षा डॉ. सौ. मधुरा भिडे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. संगमेश्वर संमेलन यशस्वी होण्यासाठी सक्रिय सहभाग घेणाऱ्या माभळे, रत्नागिरी, चिपळूण, देवरुख इत्यादी ठिकाणच्या कोकणातील भिडे मंडळींचा प्रतिष्ठानच्यावतीने कौतुक सोहळा साजरा केला. नंतर सौ. शिल्पा मुंगळे (भिडे) व सहकाऱ्यांचा एक तासाचा सांस्कृतिक कार्यक्रम सादर झाला. स्वादिष्ट व रुचकर भोजनाचा आस्वाद घेतल्यानंतर शेवटच्या सत्रात दोन तासाची खुली चर्चा ह्या कार्यक्रमात संमेलनाबद्दल काही सूचना, कौतुक त्याचप्रमाणे पुढील वर्षाचे संमेलन स्थळ ह्याबाबत उपस्थितांमधून भरघोस प्रतिसाद मिळाला. पुढील वर्षाचे (२०१६) भिडे कुलसंमेलन घेण्यासाठी नाशिक व चिपळूण येथील भिडे मंडळींनी आग्रह धरला. त्याप्रमाणे सर्वप्रथम नाशिकला प्राधान्य देण्याचे सर्वानुमते मान्य करण्यात आले. अधिकृत सुत्रानुसार सध्या नाशिक येथील भिडे मंडळींनी,

प्रतिष्ठानला संमेलन नाशिक (पिंपळगाव) येथे घेण्याबाबत संमती दर्शविली आहे. त्याबाबत काय निर्णय होतो त्याबाबत पुढील अंकात निवेदन देण्यात येईल. खुल्या चर्चेच्या कार्यक्रमानंतर श्री. माधव भिडे ह्यांनी आभार प्रदर्शन केले आणि माभळ्याच्या शेखर भिडे ह्यांच्या पसायदानानंतर, चहापान होऊन संमेलनाची सांगता झाली.

या संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचलन माभळे येथील श्री. प्रसाद भिडे आणि कु. पल्लवी भिडे या दोघांनी उत्तमरित्या केले. त्यात विशेष म्हणजे श्री. प्रसाद भिडे यांचा भारदस्त आवाज आणि या दोघांनी साधलेल्या संवाद समतोलामुळे सूत्रसंचालन अधिकच रंगतदार झाले.

माभळ्यामध्ये प्रथमच भिडे संमेलन झाले. परंतु हे संमेलन यशस्वी करण्यासाठी सक्रिय असलेले श्री. मनोहरशेठ, अनिलराव, प्रभाकर, अरुणराव, प्रसादराव, प्रमोदराव, ॲड. मुकुंदराव, सुधीर, श्रीधर, श्रीरामभाऊ, अरविंदभाऊ, दीपकशेठ इत्यादी भिडे मंडळींमुळेच प्रतिष्ठानला शक्य झाले. भिडे संमेलन म्हणजे आपल्या घरचेच कार्य आहे असे समजून सर्वांनी काम केले. माभळ्यामध्ये झालेल्या पहिल्या मिटींगपासून त्यांचा उत्साह दिसत होता. भिडे प्रतिष्ठानचे सर्व पदाधिकारी व कार्यकारिणी ह्यांचेकडून माभळे संगमेश्वर, रत्नागिरी, चिपळूण, देवरुख इत्यादी सर्व भिडे मंडळींना मन:पूर्वक धन्यवाद.

**आवाहन : ता. ९ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणीमधील रु. १०० चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केले आहे. त्यामुळे आजीव सभासद : १००० रु., हितचिंतक : ५००० रु., आश्रयदाता : १०००० रु. हे तीनच वर्ग ठेवण्यात आले आहेत. जे सभासद १०० रुपये भरून सभासद झाले आहेत. त्यांनी अधिक ९०० रु. भरून आजीव सभासदत्व घ्यावे. अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान ९०० रु. भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे.**

**श्रद्धांजली :** भिडे कुलातील खालील व्यक्तींना नुकतीच देवाज्ञा झाली अशा सर्व मृत व्यक्तींना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे. त्या सर्वांना सद्‌गती प्राप्त होवो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

१. कै. स्वरूप जगन्नाथ भिडे, पुणे

२. कै. चंद्रशेखर विठ्ठल भिडे, बांदा

३. कै. सतिश वामन भिडे, मुंबई

४. कै. चंद्रशेखर महादेव भिडे, इंदोर

५. कै. सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे

**आम्ही भिडे अंक २३ वा**

संपादक : श्री. शशिकुमार केशव भिडे

कार्यकारी संपादक : ले. क. सुनिल भिडे

संपादक मंडळ : श्री. प्रभाकर भिडे, श्री. दिलीप भिडे, विनायक स. भिडे श्री. चिंतामणी भिडे, श्री. विलास भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर, सौ. प्रिती प्र. भिडे

सल्लागार मंडळ : श्री. सुनिल भिडे (अभिरूची), शशिताई घुले, के. मो. भिडे, गजानन भिडे, रवींद्र भिडे (कर्मयोग)

अक्षर जुळणी : सौ. विनीता डबीर

## शिष्यवृत्ती

**भिडे कुलातील गरजू व हुषार तसेच शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थिनींसाठी ''प्रदीप व डॉ. शीला भिडे शैक्षणिक निधी'' मधून भिडे प्रतिष्ठानकडून शैक्षणिक आर्थिक मदत/शिष्यवृत्ती सुरू केलेली आहे. इच्छुकांनी आपले अर्ज नांव/पूर्ण पत्ता/संपर्क क्रमांक/शिक्षण अर्हता आणि पालकांचे उत्पन्न माहितीसह प्रतिष्ठानच्या पत्रव्यवहाराकरीता असलेल्या पत्त्यावर त्वरीत पाठवावेत. सदरहू शिष्यवृत्ती विना परतफेडीची आहे.**

**कौतुक :** अखिल भारतीय चित्पावन संघ, डोंबिवली शाखेतर्फे **डॉ. सौ. वसुधा विद्याधर भिडे,** पुणे ह्यांनी चित्पावनी हा प्रबंध लिहून चित्पावनांची अस्मिता जागृत केल्याबद्दल १५ फेब्रुवारी, २०१५ रोजी डोंबिवली येथे अखिल भारतीय चित्पावन संघ, डोंबिवलीचे अध्यक्ष श्री. नरेंद्र जोग ह्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. स्मृतिचिन्ह, शाल, श्रीफळ आणि रोख ११,०००/- रुपये असे त्याचे स्वरूप होते.



## देणगीदारांची नावे जानेवारी २०१५ ते मार्च २०१५


| | | | |
|---|---|---|---|
| १. महिला समिती भिडे प्रतिष्ठान | | देणगी | १२,५०० |
| २. श्री. कुमार विष्णू भिडे | पुणे | (पुरस्कार देणगी) | ११,००० |
| ३. श्री. मिलींद रामचंद्र भिडे | अहमदनगर | (हितचिंतक) | ५००० |
| ४. श्रीमती शशीताई घुले | पुणे | महीला समिती देणगी | ५००० |
| ५. श्री. अरविंद श्रीपाद भिडे | पुणे | (हितचिंतक) देणगी | ५००० |
| ६. श्री. विजयसिंह विष्णुपंत भिडे | पिंपळगाव,नाशिक | (हितचिंतक) | ५००० |
| ७. सौ. मंजुषा मनिष साठे (भिडे) | पुणे | (आजीव सभासद) | २००१ |
| ८. श्रीमती उमा व्ही. भिडे | माहिम | देणगी | १००० |
| ९. उर्मिला एस. भिडे | बांद्रा | देणगी | १००० |
| १०. शिल्पा सहस्रबुद्धे | दादर | देणगी | १००० |
| ११. सौ. प्रज्ञा प्र. भिडे | दादर | देणगी | १००० |
| १२. सौ. वैशाली भिडे | चेंबूर | देणगी | १००० |
| १३. सौ. सुचित्रा शाह (भिडे) | माहिम | देणगी | १००० |
| १४. सौ. अर्चना एस. भिडे | मालाड | देणगी | १००० |
| १५. सौ. वरदा (भिडे) जोगदंड | दादर | देणगी | १००० |
| १६. श्री. अरविंद श्रीपाद भिडे | पुणे | वाढदिवस देणगी | १००० |
| १७. श्री. रामकृष्ण (अरविंद) वा. भिडे | कल्याण | देणगी | १००० |
| १८. श्री. चंद्रशेखर श्रीधर भिडे | बोरीवली | देणगी | १००० |
| १९. श्री. मिलिंद श्रीधर भिडे | बोरीवली | देणगी | १००० |
| २०. श्री. चिंतामणी जनार्दन भिडे | ठाणे | देणगी | १००० |
| २१. श्री. मुकुंद हरीभाऊ भिडे | सांगली | (आजीव सभासद) | ९०० |
| २२. श्री. गोपाळ अनंत भिडे | अलिबाग | (आजीव सभासद) | ९०० |
| २३. श्री. प्रदीप जनार्दन भिडे | डोंबिवली | देणगी | ५०० |

# प्रवासातील ओळख

दिलीप भिडे, (पुणे)
९६५७५४१२३६

सुमारे आठ वर्षांपूर्वी आम्ही १५-२० जण रेल्वेने जम्मू-काश्मिर, अमृतसर, दिल्ली ट्रीपला निघालो होतो. रेल्वेच्या प्रवासात सरबजितसिंग नावाच्या एका सैन्य अधिकाऱ्याची ओळख झाली. सुरुवातीला त्यांचा उग्र चेहरा व स्वभाव रागीट असावा असे वाटणाऱ्या आकड्यांच्या मिशा पाहून हा माणूस जरा आखडू आहे असे वाटले. पुणे ते जम्मू प्रवास तसा मोठा होता. सरबजितसिंग स्वत: अमृतसरचे रहिवासी असल्यामुळे त्यांनी अमृतसर, जम्मू, काश्मीर, दिल्लीची माहिती दिली. बोलता-बोलता अमृतसरजवळ वाघा बॉर्डर, जालियनवाला बाग, सुवर्ण मंदिराकडे कसे जायचे, कुठे राहायचे अशी चर्चा सुरू झाली. अमृतसरला सुवर्ण मंदिरात तुमची अगदी थोड्या पैशात सोय करतो असे सांगितले आणि स्टेशनवर तुम्हाला आणायलासुद्धा येतो, असेही म्हणाले; परंतु आम्ही विचार केला की प्रवासात असे आश्वासने देणारे बरेचजण असतात; परंतु तरीही एकमेकांनी फोन नंबर घेतले. प्रवासात त्यांच्याबरोबर दुपारचे जेवणही घेतले. पठाणकोटला ते उतरले आणि आमचा पुढील प्रवास सुरू झाला. परत येताना जम्मूहून रात्री आठची रेल्वे होती. ती अमृतसरला पहाटे चार वाजता पोचते; परंतु त्या दिवशी रेल्वे नेमकी लेट असल्यामुळे अमृतसरला सकाळी सात वाजणार अशी अपेक्षा होती म्हणून मी सहज त्यांच्या घरी फोन केला. त्यांच्या पत्नीने सांगितले, की ''महाराष्ट्रके कुछ लोक अमृतसर सुबह चार बजे आनेवाले है, उनको लाने के लिए वो स्टेशनपर गये है।'' हे ऐकल्यावर मी चकित झालो. गाडी अमृतसर स्टेशनला साडेसातला पोचली, तर साक्षात सरबजितसिंग दोन रिक्षावाल्यांना घेऊन पहाटे चारपासून आमची वाट पाहात होते. रिक्षाने सर्व सामान घेऊन आम्ही सुवर्ण मंदिराकडे रवाना झालो. सुवर्ण मंदिरात आपल्या स्वत:च्या नावावर एका हॉलमध्ये फक्त ५० रुपयांत आमची व्यवस्था चोख केली. लंघरमध्ये जेवण झाले. सुवर्ण मंदिर पाहिल्यावर आम्ही दुपारी वाघा बॉर्डर व जालियनवाला बघून, सात वाजता स्टेशनवर दिल्लीला जाण्यासाठी पोचलो. रात्री नऊची गाडी असल्यामुळे सरबजितसिंग आम्ही निघेपर्यंत थांबणार होते; परंतु मध्येच आठच्या सुमारास त्यांना एक फोन आला आणि ते म्हणाले, ''घरसे बुलावा आया है, मैं घरको निकलू क्या? मुझे जाना जरुरी है लेकिन आप लोग नाराज नही होना.'' जाताना त्यांनी आमच्याकरिता पाच किलो सफरचंद व २५ संत्री दिली आणि ते आपल्या घरी गेले. आम्ही सर्व जण आपापल्या घरी पोचल्यावर त्यांनी दोन दिवसांनी फोन केला त्या वेळेस त्यांची इ. १२ वीत शिकणारी मोठी मुलगी मृत्यू झाल्याचे त्यांनी सांगितले, म्हणजे आम्ही अमृतसर स्टेशनवर असताना त्यांना जो फोन आला होता तो फोन त्यांच्या पत्नीचा होता आणि मुलगी अत्यवस्थ झाल्याचा निरोप होता म्हणून ते घाईने घरी गेले. मुलीचे निधन झाल्याचे ऐकल्यावर मी सुन्न झालो. मी म्हणालो, की तुम्ही आम्हाला बोलला असतात तर आम्ही तुम्हाला एवढे घेऊन फिरलो नसतो. त्यावर ते म्हणाले, ''आप हमारे मेहमान है, माझे दु:ख तुम्हाला सांगून तुमच्या ट्रीपच्या आनंदावर विरजण कशाला घालायचे म्हणून तुम्हाला बोललो नाही.'' त्या धक्क्यातून त्याच्या पत्नी जवळजवळ एक वर्ष सावरल्या नव्हत्या. आजारी होत्या. त्यानंतर दोन वर्षांनी ते पुण्याला आले होते तेव्हा जम्मूला तांदूळ चांगला मिळतो म्हणून दहा किलो तांदूळ घेऊन आले. त्यानंतर पत्नीसह पुण्यात आल्यावर आमच्याकडे जेवायला आले होते. वैशाखी, दिवाळी, सणासुदीला आणि मधूनमधून त्यांचे फोन होत असतात. सध्या ते अमृतसरमध्येच राहतात. निवृत्त झालेले आहेत. रक्ताचे नातेसंबंध नसताना प्रवासात झालेली ओळख एकमेकाला किती आनंद देऊन जाते. माणसे एकमेकाला आधार असतात.

# आदर्श कार्यकर्ता पुरस्कार – २०१५



श्री. चिंतामणी जनार्दन भिडे, रा. ठाणे यांना यावर्षी प्रथमच व नव्याने पुरस्कृत झालेला 'आदर्श कार्यकर्ता' पुरस्कार संगमेश्वर येथे २०१५ मध्ये झालेल्या भिडे कुल संमेलनात सौ. नेहा सातर्डेकर (भिडे) यांचे हस्ते प्रदान करण्यात आला. हा पुरस्कार भिडे प्रतिष्ठानचे कार्यवाह कै. दामोदर (दामुकाका) केशव भिडे, डोंबिवली यांचे स्मरणार्थ त्यांची कन्या (अनघा) सौ. नेहा किरण सातर्डेकर, डोंबिवली यांनी पुरस्कृत केलेला आहे. श्री. चिंतामणी वाणिज्य शाखेचे पदवीधर असून, व्यवस्थापन पदवीका मिळवीलेली आहे. २२ वर्षे विविध आस्थापनेमध्ये नोकरी केल्यानंतर उपव्यवस्थापक पदावर असताना २००२ मध्ये स्वेच्छानिवृत्ती घेऊन उत्पादन शुल्क आणि सेवाकर सल्लागार व्यवसाय सुरू केला. २००३ पासून भिडे प्रतिष्ठानच्या कुलवृत्त आवृत्तीचे सहसंपादक म्हणून काम केले आहे. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व असल्यामुळे परदेशात असणाऱ्या भिडे कुलोत्पन्नाना नेटवर संपर्क करून कुलवृत्तांत त्यांची माहिती येण्याच्या दृष्टीने विशेष प्रयत्न केले. २००५-२००६ या वर्षी त्यांची प्रतिष्ठानचे कोषाध्यक्ष म्हणून नेमणूक झाली तसेच कुळ संमेलन असो वा कार्यक्रम असो प्रतिष्ठानच्या कामात सक्रीय आहेत. २००५ ते २०१४ पर्यंत सुमारे ९ वर्षे कोषाध्यक्ष हे जबाबदारीचे व विशेष जोखमीचे पद विश्वासाने सांभाळले. वक्तृत्व भाषाशैली उत्तम असल्यामुळे भिडे प्रतिष्ठानचे कार्य नेटाने पुढे नेणारा आदर्श व कार्यकर्ता म्हणून निवड करण्यात आली. कै. दामुकाकांची प्रतिष्ठानशी किती जवळीक होती हे सर्वांना ज्ञान आहेच. याशिवाय त्यांच्या स्मरणार्थ देण्यात येणारा पहिला पुरस्कार श्री. चिंतामणी भिडे यांना देण्यात येत आहे. हे गौरवास्पद आहे.

## कला पुरस्कार – २०१५ प्रदान



२०१५ संगमेश्वर येथे जाहीर केलेला कला पुरस्कार या वर्षी सौ. सुमती वामन भिडे यांना त्यांचे पुण्यातील निवासस्थानी देण्यात आला. प्रकृती अस्वास्थ्यामुळे हा पुरस्कार स्वीकारण्यासाठी संगमेश्वर कुल संमेलनात त्या उपस्थित राहू शकल्या नाहीत. या प्रसंगी सौ. सुमतीताईंचे पती श्री. वामनराव, त्यांचे चिरंजीव मेजर जनरल (नि.) संजय आणि स्नुषा सौ. सुषमा यांचेसह प्रतिष्ठानचे पदाधिकारी श्री. शशीकुमार, श्री. दिलीप व ले. क. (नि.) सुनिल भिडे हजर होते.

**कुलवृत्त कशासाठी ? : आपल्या घराण्याचा पूर्वापार व खरा इतिहास कळल्यास आपल्या पूर्वजांच्या मनोवृत्ती कशा होत्या, त्यांच्या अंगी मुख्यत्वेकरून कोणते गुण होते, त्यांचे शील कसे होते, त्यांच्या वेळच्या परिस्थितीत व आजच्या परिस्थितीत जो काय फरक झाला असेल तो राष्ट्रहिताच्या दृष्टीने कितपत इष्ट किंवा अनिष्ट आहे. याचा तुलनात्मक दृष्टीने विचार करण्यास असे घराण्याचे स्वतंत्र इतिहास बाहेर पडणे अत्यंत जरुरीचे आहे.**

**संदर्भ : आपटे घराण्यातील इतिहासावरील अभिप्राय – लोकमान्य टिळक, दै. केसरी, २४/११/१९१४**

# कुलवृत्ताच्या निमित्ताने...!

**– प्रभाकर शं. भिडे, डोंबिवली**
**मो. ९८९२५६३१५४**

साधारण २००० चा डिसेंबर महिना. बत्तीस वर्षांच्या नोकरीनंतर स्वेच्छानिवृत्ती घेतली होती. आता पैशाकरता काम करण्याऐवजी काहीतरी आवडीचे काम करावे, जे आतापर्यंत करू शकलो नव्हतो, असे वाटत होते. माझी आवड पुस्तकाचे वाचन व त्यातून येणारी लिखाणाची ऊर्मी. काय करावे याबद्दल मनात थोडा गोंधळ होता. अचानक एक दिवस एक परिचित गृहस्थ श्री. दामुकाका भिडे घरी आले. त्यांनी 'कुलवृत्ताचे काम चालू आहे. आपण डोंबिवलीतील भिड्यांची माहिती गोळा करून पाठवू या. त्या करता तुम्ही दर रविवारी मला मदत कराल का ?' असे विचारले. मग दर रविवारी आम्ही डोंबिवलीतील भिडे लोकांची माहिती गोळा करू लागलो. काम करताना अनेक लोकांशी संपर्क येऊ लागला. काहींनी आपुलकीने माहिती दिली. मदत करण्याची तयारी दाखवली. क्वचित काहींच्या चेहऱ्यावर आठ्या उमटल्या. 'याचा उपयोग काय ? अशा प्रकारे वेळ घालवण्याचे दिवस केव्हाच संपले.' अशा प्रतिक्रिया मिळत होत्या. आम्ही मात्र नेटाने काम चालू ठेवले.

डिरेक्टरीमधून घेतलेल्या पत्त्यावरून शोधायचा प्रयत्न केला. एका निरपेक्ष कामाचा आनंद मिळू लागला. एक प्रकारे सरकारी जनगणनेच्या कामासारखे वाटत होते. सरकार ते काम दर दहा वर्षांनी करते. त्यातून अनेक निष्कर्ष, गमतीदार गोष्टी कळतात. ब्रिटिशांनी १९१० सालापासून हे काम चालू केले होते. राज्यकर्त्यांना अशा कामातून लोकांची सामाजिक/आर्थिक स्थिती कळते. त्यातूनच भावी सुधारणा, विकासाच्या योजना आखल्या जातात. पण आपल्या कामाचे काय? वाटले, यातूनही समाजातील ठराविक घटकांची माहिती मिळू शकते. ते सुद्धा समाजाचा एक भाग आहेत. त्यातूनच समाजाच्या परिस्थितीची कल्पना येऊ शकते. हाही एक प्रकारचा सॅंपल सर्व्हे आहे. थोड्या दिवसांत आम्ही येथील काम संपवून दादर येथील मुख्य कार्यालयात जाऊ लागलो. तोपर्यंत एक समवयस्क लोकांचा ग्रुप तयार झाला. मजा येऊ लागली. लवकरच त्याचे मैत्रीमध्ये रूपांतर झाले. ज्याची निवृत्तीनंतर गरज होती. दादरच्या कार्यालयात कळले, की महाराष्ट्र व इतर ठिकाणांहून एकूण दोन हजार भिडे कुटुंबांची माहिती गोळा करायची आहे. सर्व लोक तर माहिती देणार नाहीत. पण सत्तर टक्क्यांपर्यंत तरी माहिती मिळेल. त्यावर कुलवृत्त तयार करावे लागेल. पण आतापर्यंत आम्हाला अनेक ऐतिहासिक व चित्रचक्षुचमत्कारिक गोष्टी कळल्या होत्या. त्यात उत्सुकता वाटू लागली होती. याच दरम्यान आणखी एक गोष्ट घडली. मुख्य काम करणारे राजमुद्रा या प्रिंटिंग प्रेसचे मालक काही कारणामुळे बाहेरगावी स्थलांतरित झाले. पण कार्यकारिणीच्या हुषार व तत्पर लोकांनी मीटिंग घेऊन कुलवृत्त संपादनाची सर्व जबाबदारी आमच्यावर सोपवली व दोन-तीन वर्षांत काम पुरे करून कुलवृत्त प्रकाशित करावे असे ठरवण्यात आले. आता अचानक मुख्य संपादकाची जबाबदारी पडल्यामुळे आलेल्या संधीचे सोने करावे जेणेकरून आपल्या नावावर एक तरी पुस्तक जमा होईल असे वाटले.

प्रारंभी सर्व वंशावळीचे नकाशे (वंशवृक्ष) बनवण्याचे ठरवले, जेणेकरून किती कुटुंबांची माहिती येणे आहे ते कळेल. दोन-तीन महिन्यांत जवळजवळ साठ शाखांचे नकाशे बनवले. यामध्ये डोंबिवलीच्या विनायक भिड्यांची चांगली मदत झाली. त्यावेळी लक्षात आले की फक्त चाळीस टक्केच माहिती आली आहे. पण उरलेली माहिती कशी मिळणार ? पण जशा अडचणी येतात तशा त्या सोडवण्याचे मार्ग सापडू लागतात. एकाने सुचवले की मूळ गावे कोकणात आहेत तेथे जावे व मूळ स्रोत समजून घ्यावा. भिड्यांचे मुख्य मूळ गाव रत्नागिरीजवळील 'गणपती पुळे' हे प्रसिद्ध असलेले तीर्थक्षेत्र आहे. या गणपतीची स्थापना जवळच्या 'उंडी' नावाच्या त्रिंबक भट्ट भिडे यांनी केली. इथेच भिडे कुलवृत्ताचा श्रीगणेशा झाला. कारण त्यांच्यावर अनेक संकटे/अडचणी आल्या असता त्यांनी त्या जागेवर गणेशाची उपासना सुरू केली. पूर्वी सर्व संकटांवर देवाची उपासना हा एकच मार्ग असे. सुदैवाने संकटे दूर झाली. पुढे देवाची प्रचिती येऊन त्यांना गणेशाची स्थापना करण्याचा दृष्टांत झाला. ही गोष्ट आहे चारशे वर्षांपूर्वीची. त्यावेळी भारतावर मोगली साम्राज्य होते. आजही त्यांची समाधी देवस्थानच्या आवारात आहे. आज त्या गणपतीची भरभराट बघून आश्चर्य वाटते. जवळजवळ चारशे-पाचशे माणसे त्या देवस्थानच्या सेवेत असून त्यांचा प्रपंच देवस्थानावर अवलंबून आहे.

सुदैवाने त्या देवस्थानचे सरपंच डॉ. विवेक भिडे निघाले. त्यांना आमचा उद्देश सांगितल्यावर त्यांनी स्वत:च्या गाडीने नेऊन पूर्वजांच्या घराचे चौथरे वगैरे दाखवले. माहिती सांगितली. तेथे देवस्थान असल्यामुळे विविध शाखेचे लोक येऊन राहात. पूर्वी लोक पोटापाण्यासाठी विविध ठिकाणी जात. जवळच्या निवेंडी, आडिवरे अशा अनेक गावी जाऊन बऱ्याच लोकांची (त्यांच्या शाखांची) माहिती मिळाली. त्यात अनेक गोष्टी कळल्या. तीनशे वर्षांपूर्वी अनेक कोकणस्थ ब्राह्मण (बहुधा गरिबीमुळे) कर्नाटकात गेले. तेथे त्यांना शेती विशेषत: बागायतीसाठी जमिनी खंडानी किंवा संस्थानिकांकडून इनाम मिळाल्या. तेथे त्यांनी नारळीपोफळी इतकेच नव्हे तर रबराच्या बागा उभ्या केल्या. अशाच एका गावी (मुंडाजे, मंगलोरजवळ) जाण्याचा योग आला. तेथे अनेक मराठी कुटुंबे असून भिडे मंडळीही आहेत. ते मेहनतीने अत्यंत सुस्थितीत आहेत. त्यापैकी एक भिडे तर कर्नाटक रबर ग्रोअर सोसायटीचे अध्यक्ष आहेत. ते नॅचरल रबरापासून अनेक वस्तू बनवतात. कर्नाटक सरकारचे त्यांना सहकार्य व आर्थिक मदतही मिळते. त्यांनी त्यांच्या वाडवडिलांच्या नावाने बारावीपर्यंत शाळाही सुरू केली आहे. मात्र त्याचे माध्यम कानडी आहे. ते घरात चित्पावनी भाषा बोलतात. ती मराठीची बोलीभाषा आहे. जशा कोकणी, मालवणी वगैरे आहेत. आता आपल्याकडे मात्र ही बोलीभाषा बोलली जात नाही. त्यांनी मात्र आपल्या पूर्वीच्या रुढीपरंपरा जपल्यात. एकंदरीत महाराष्ट्रातील पूर्वपरंपरा इतर

राज्यांतील मराठी लोक आवर्जून जपतात असे दिसले. इतकेच नव्हे, तर ते एकत्र राहतात! एकमेकांना भेटतात, मदत करतात. तेथे त्यांच्या अनेक संस्था आहेत. दुर्दैवाने असे चित्र महाराष्ट्रात दिसत नाही. कर्नाटकात अनेक मराठी लोक, त्यात ब्राह्मणही आले, शेती बागायती करून अतिशय उत्तम परिस्थिती आहेत. तेथील कानडी समाजाशी एकरूप झाले आहेत. बेळगाव, कारवार प्रश्नावर आता हा एकमेव तोडगा शिल्लक आहे. किती वर्षे तुम्ही शेजारी राहून भांडणार?

पूर्वीचे प्रसिद्ध नट शंकर घाणेकर यांच्या गावी (सडे वृंदावन येथे) जाण्याचा योग आला. ते गाव अतिशय छोटे असूनही तिथे नाट्यगृह आहे. विशेष नवल म्हणजे विनोदी नट शंकर घाणेकर यांचे निधन तेथील नाट्यगृहात नाटक करतानाच झाले. एखाद्या नटाला नाटकाच्या स्टेजवर (स्वतःच्या गावात) मृत्यू यावा ही नवलाची गोष्ट आहे. अशा विविध ठिकाणी (जेथे पूर्वी भिडेमंडळी राहात होती) जाऊन आल्यामुळे त्यांचे मूळ स्रोत कळलेच, शिवाय अन्यही बरीच माहिती मिळाल्याने त्यात रस वाढला.

या अशा मागच्या पिढ्यांच्या माहितीच्या अभ्यासातून अनेक चांगल्या गोष्टी कळल्या. हल्ली धनसंपत्ती किंवा पैसे ठेवण्याकरता बँकांची सोय उपलब्ध



आहे, पण पूर्वी अशा सोयी नव्हत्या. मग पूर्वीच्या काळी पैसा सुरक्षित ठेवण्यासाठी काय सुविधा होत्या? विशेषत: राजेरजवाडे, सावकार, धनिक लोक आपली धनसंपत्ती किंवा दागदागिने कशी ठेवत? इतिहास चाळला असता असे दिसते की राजे/प्रधान/पेशवे आपले दागदागिने पैसे अनेक ठिकाणी विभागून ठेवीत. प्रत्येक ठिकाणी खजिन्याचा १०/२० टक्के भाग ठेवला जाई. अशाच खजिन्याचा छोटा भाग साताऱ्याजवळील सबनीसवाडी येथील भिड्यांच्या छोट्या गढीत ठेवला होता. त्याचे रक्षण करण्याकरता त्यांनी शिपाईगिरी पत्करली होती. इतकेच नव्हे तर त्या घरातील प्रत्येक पुरुषाला व्यायाम व सैनिकासारखे ट्रेनिंग देत असत. पुढे इ.स. १८१८ मध्ये इंग्रजांनी मराठी राज्य खालसा केले. दुसऱ्या बाजीरावास पेन्शन व बराच मुलुख देऊन कानपूरजवळील ब्रह्मार्वतास नेऊन बसवले. आता सबनीस भिडे मंडळींना प्रश्न पडला की आपल्याजवळील मराठी खजिन्याचे काय करायचे ? पण त्यांची स्वामीनिष्ठा इतकी प्रचंड की त्याने बैलांच्या पाठीवर लमाणांच्या साहाय्याने खजिना लादला. ब्रह्मार्वतास पेशव्यांना नेऊन दिला. पेशव्यांनी त्यांच्या स्वामीनिष्ठेचे कौतुक केले. आता तुम्हाला काय बक्षीस देऊ असे विचारले. त्यावर स्वामीनिष्ठ सबनीसांनी सांगितले की आम्हाला बक्षीस नको. तुम्ही परत पुण्याला या व राज्य करा ! दुर्दैवाने पेशव्यांना ते शक्य नव्हते. पुढे या भिड्यांची परिस्थिती खालावली. त्यांनी शेती व शिकार असे अनेक उद्योग केले.

छत्रपती शिवाजी महाराजांनी सर्वांत सुरक्षित राजधानी म्हणून आपली राजधानी रायगड किल्ल्यावर केली. तेथे सैन्य व मंत्रिमंडळातील सहकारी धरून दहा हजारच्या वर लोक/शिबंदी राहात असत. यांना व इतर किल्ल्यांवरील लोकांना, शिबंदीला आवश्यक ती साधनसामग्री (धान्य व दारूगोळा इत्यादी) नियमित व अखंडपणे मिळावा याकरता मराठी राज्यकर्त्यांनी बंदरापासून (राजापुरी, कल्याण वगैरे) राजधानीपर्यंत दोन-तीनशे किलोमीटरचा रस्ता सुरक्षित असावा याकरता प्रत्येक पंचवीस किलोमीटरवर नायक पदावर अनेक लोकांची नेमणूक केली. त्यांच्याजवळ स्वत:चे थोडे सैन्य किंवा सैन्याचा विभाग असे. त्यांचे काम की तो २५ किलोमीटर रस्त्यावरील रसद सुरक्षितपणे रायगड व इतर किल्ल्यापर्यंत पोचवणे. हर्णेजवळ या कामी कृष्णा नायक (भिडे) माणसाची नेमणूक केली असल्याचे अभ्यासातून समजले. त्या व्यवस्थेकरता त्याला उत्पन्नाची साधने व जमीन देण्यात आली होती असे त्यांच्या वंशजांकडून कळले. इतकेच नव्हे तर त्यांना स्थानिक सामाजिक व धार्मिक कार्यात मानाने बोलवण्याची प्रथा त्यावेळी होती. गणपतीमुळे येथील उत्सवात त्यांना ढोल वाजवून आमंत्रण देण्यात येई.

आपल्याकडे पूर्वी मौखिक परंपरा होती. त्यामुळे डॉक्युमेंटेशनचा प्रयत्न दिसत नाही. साहजिकच त्या त्या कर्तृत्वमान माणसांबरोबर त्यांचे अनुभव नाहीसे होत. या उलट मोगलांच्या दिल्ली दरबारामध्ये राजाची रोजची दिनचर्या लिहिली जात असे. म्हणूनच प्रसिद्ध विचारवंत पु. ग. सहस्रबुद्धे यांनी आपल्या 'चिंतन' या पुस्तकात लिखित परंपरेच्या अभावी आपले किती नुकसान झाले आहे याचे अनेक दाखले दिले आहेत. पेशवे कालखंडात पहिला बाजीराव हा अतिशय पराक्रमी, धाडसी, चपळ लढवय्या सेनापती होता. वीस वर्षांच्या त्याच्या कारकिर्दीत तो एकही लढाई हरला नाही असे अभिमानाने सांगतात. पण त्यानंतर येणाऱ्या सेनापतीस आपली कोरी पाटी घेऊनच लढाईस जावे लागले. वेगवेगळ्या राजपूत राजांनी जवळजवळ आठशे वर्षे मोगलांशी लढा दिला. कधी ते हरले कधी त्यांना यश मिळाले. त्यांना अनेक अनुभव आले असतील. पण लिखित स्वरूपात ते उलब्ध नसल्यामुळे पुढच्या पिढ्यांना त्या अनुभवांचा काहीच फायदा झाला नाही. या उलट इंग्रजांच्या राज्यात प्रत्येक राज्याचा ब्रिटिश गव्हर्नर आपले अनुभव डायऱ्यांमधून लिहून ठेवील. अशा राज्यपालांच्या अनेक डायऱ्या ब्रिटिश सरकारने (पन्नास वर्षांनी) प्रकाशित केल्या आहेत. त्यामधून भारतीय लोक कसे होते ते समजते.

अशा विशिष्ट तऱ्हेचे काम करताना अनेक गमतीदार तसेच अनपेक्षित अनुभव येतात. एके दिवशी आम्हाला रिझर्व्ह बँकेतून निवृत्त झालेल्या एका भिडे भगिनीचा पत्ता मिळाला. त्यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी ख्रिश्चन असल्याचे नमूद केले. नाव टिपिकल मराठी असल्याने जरा आपुलकीने चौकशी केली असता त्यांनी ख्रिश्चन धर्म कसा स्वीकारला ते सांगितले. पुण्याला १९१८ साली म्हणजे शंभर वर्षांपूर्वी प्लेगची (बहुधा शेवटची) साथ आली होती. त्यावेळी त्यांच्या आजोबांचे आई-वडील व इतर नातेवाईक यांचे साथीत निधन झाले. त्यावेळी आजोबा तीन वर्षांचे होते. एकच मुलगा जिवंत राहिला. अशा अनाथ मुलाला कोणीतरी पुण्याला 'पंचहौद मिशन' या ख्रिश्चन मिशनमध्ये ठेवले. तेथे त्यांना चांगले शिक्षण मिळाले. ते हुषार असल्याने चांगल्या शिक्षणामुळे ब्रिटिश राज्यात चांगली नोकरी मिळाली. साहजिकच त्यांनी पुढे ख्रिश्चन धर्म स्वीकारला. या बाईंनी परिचयानंतर आपल्या बंधूंचा पत्ता दिला. पण त्यांना या कामात रस नसल्यामुळे तो विषय तेथेच संपला. वास्तविक ही माहिती कुलवृत्तांतास उपयुक्त ठरली असती.

ज्या पानिपतावर जानेवारी १७६१ मध्ये मराठी सैन्याचा लाजिरवाणा पराभव झाला, तो ज्यांनी केला त्या अफगाणिस्तानच्या अहमदशहा अबदालीने त्यापूर्वी तीन वेळा भारतावर स्वारी करण्याचा प्रयत्न केला. तिन्ही वेळी त्याचा पराभव झाला होता. त्यापैकी तिसरी लढाई २१ एप्रिल १७५८ रोजी झाली. त्या लढाईचे वर्णन हरी रघुनाथ भिडे मु. लाहोर. नदी यैरावती तीराहून चैत्र शु. १३ च्या पत्रात श्रीमंत नानांना कळवले आहे (ते पत्र उपलब्ध आहे). ते असे...

लाहोरी प्रांती श्रीमंत अब्दुल समदखान सरदहेत होता त्यांचे पारपत्य करून तो मुलुक, प्रा. मा. डुवबे हे दोन्ही तालुके आदिनाबेग मोगल यांजकडे खंडणी ठरवून स्वाधीन केले. पुढे मजल दरमजल ज्याहान खान (अबदालीचे दिवाण) व अबदालीचे पुत्रासह वर्तमान लाहुरी (लाहोर) वीस हजार फौजनसी होता त्यावर चालून गेले. तेव्हा विपाशा नदीतिरीहून सड्या फौजा मराठे सरदार मानाजी पायगुडे व गंगाधर बाजीराव रेठरेकर, गोपाळ गणेश बर्वे रवाना झाले. यासी त्याची मारनिलेशी गाठ पडली. तेव्हा ते पराभवाने घाबरा होऊन, आपले बुणगे व तोफखाना वगैरे कित्येक मागे टाकून सडा ती चौ हजार फौजेनसी चिनाब नदीपार उतरोन जीव रक्षणामुळे पलाला. आपले फौजेने नदी परिमंत पाठलाग करून सर्व फौज तोफखाना लुटला. पुढे चिनाब पार व्हावे तरी नदीस पाणी फार, उपाय नाही म्हणून राहिले. नाही तर तोची लुटला जाता. भगवंते रक्षिला. ज्याहानखान व तैमूरशहा (दिल्लीचे पातशहा) सलावतीने पळाले. इतकियाने या प्रांती वर्तमान हिंदुस्तान रजवाड व दिल्ली व जाठ वगैरे यावरी सलावत भारी पडली. या वेळी दक्षिण फौजा पहिले दिल्ली आलाकडे आली नव्हती ते चिनाब नदी पर्यंत पोचली. चिनाबेस पाणी थोडे असते तरी आटक परियंत जाती. सहत मात्र अटक पार होऊन गेली. पुढे पूल बांधून फौजा जाव्यात त्यास अटकाव भारी पडेल. मग छावणीस मूळ आले. छावणी दूर देशी करता नये. त्याहीवरील लोक कष्टी होतात यैसे आसोन सहसा विदर्धात न क्रिया म्हणून लाहोर प्रांतीचा बंदोबस्त करून श्रीमंत साहेब देशोदेशे माघारी फिरतलसे दिसते. यावरी भगवंतासता प्रमाण जाले. वर्तमान सेवेसी लिहिले. कृपा लोभाची वृधि कीजे हे विनंती.

वरील पत्राने त्यावेळच्या परिस्थितीची कल्पना येते. ही ऐतिहासिक पत्रे कुलवृत्ताच्या कामामुळे बघता आली.

१८४८ साल हे स्त्री शिक्षणाच्या दृष्टीने इतिहासात महत्त्वाचे ठरले. त्या

काळात वेडगळ कल्पना, दुराग्रह ह्याला प्रखर विरोध करून आपले सामाजिक सुधारणा करण्याचे कार्य चालू ठेवणारे अनेक सामाजिक कार्यकर्ते होते. त्यामध्ये पुण्यात जोतिबा फुले व सावित्रीबाई फुले हे दांपत्य अग्रेसर होते. त्यांचे मित्र व सहकारी सदाशिवराव गोवंडे, जगन्नाथ सदाशिव परांजपे, वाळवेकर व तात्यासाहेब भिडे हे होते. या भिड्यांचा सिटी पोस्ट चौकाजवळ मोठा वाडा होता व त्यामध्ये फक्त चार माणसे राहत होती. त्यांची परिस्थिती चांगली होती. ते परोपकारी, नि:पक्ष व उदारमतवादी होते. तसेच जोतिबा फुले यांचे स्नेही होती. त्यांनी तात्यासाहेबांना मुलींची शाळा सुरू करण्याचा संकल्प कथन केला. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे प्रभावी साधन असल्यामुळे, हा नाविन्यपूर्ण संकल्प फार आवडला. त्यांनी त्वरित आपल्या वाड्यातील जागा शाळेसाठी देण्याचे मान्य केले. याशिवाय या जागेचे भाडे न घेता या क्रांतीकार्यास १०१ रुपयांची देणगी दिली. तसेच दरमहा खर्चासाठी पाच रुपये वर्गणी देण्याचे मान्य केले. वाड्याच्या पुढील चौकात शाळा सुरू झाली. सावित्रीबाई फुले या शाळेच्या पहिल्या शिक्षिका आणि मुख्याध्यापिका झाल्या. दीडशे वर्षांपूर्वी स्त्रियांना शिकवणे व त्यासाठी मुलींना शाळेत पाठवणे म्हणजे एक अपराध होता. मुलींनी शिक्षण घेतले तर त्यांना अकाली वैधव्य येईल, तसेच विद्याभ्यासाने तिची पापाचरणाकडे प्रवृत्ती होईल अशी समजूत होती. परंतु फुले दांपत्य व त्यांचे सहकारी यांनी अशा चुकीच्या समजूत असणाऱ्या लोकांचे अपशब्द व निर्भत्सना सहन करून शिक्षणासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पहिल्या वर्षी फक्त सहा मुली आल्या. त्यामध्ये चार ब्राह्मण, एक धनगर व एक मराठा मुलगी होती. सुरुवातीला पालक मुली शाळेत पाठवण्यास तयार नसत. पण फुले दांपत्याने शिक्षणाचे महत्त्व पटवून त्यांची मते अनुकूल करण्यास यश मिळवले. पुढे ख्रिस्ती मिशनऱ्यांपेक्षा एकद्देशीय शाळा बरी असे लोकांना वाटू लागले. साहजिकच विद्यार्थिनींची संख्या वाढू लागली. याचा परिणाम म्हणजे या भिडे वाड्यातील पहिल्या शाळेच्या यशानंतर पाठोपाठ पुण्यात नऊ शाळा निघाल्या. पुढे पुणे जिल्ह्यात तळेगाव, शिरवळ, सातारा अशा अनेक ठिकाणी शाळा सुरू झाल्या. त्यावेळी 'दस्ती' नावाच्या शाहीराने पोवाडा रचला. त्याच्या सुरुवातीला ओळी... ***जोतिबाची एका किर्त। भिड्यांच्या वाड्यात।***

***शाळेमध्ये मुली होत्या बहुत। ब्राह्मण, शेणवी, प्रभू ज्ञात ॥***

सध्या या वाड्याची पुणे महानगरपालिकेतर्फे संरक्षित वास्तू करण्याचा प्रयत्न चालू आहे. हा वाडा हल्ली जिथे प्रसिद्ध दगडूशेठ हलवाई गणपती बसवतात त्याच्या समोर असून तेथे फुलांची बरीच दुकाने आहेत. तसेच वाड्याचा काही भाग पाडून बहुमजली इमारत बांधण्यात आली आहे.

ज्यांना इतिहास जाणून घेण्यात उत्सुकता आहे त्यांना कुलवृत्त हे एक साधन आहे. कारण त्यामुळे आपल्याला पूर्वीच्या परंपरा व संस्कृती कळते. पूर्वीचे लोक जाणून घेता येतात. पुढील जीवनाची दिशा ठरवण्यास मदत होते. एका मर्यादित उद्देशाने आम्ही अनेक लोकांना वेगवेगळ्या गावांना भेटलो. ती माणसे जाणून घेण्याचा प्रयत्न केला. तेव्हा जग कल्पनेपेक्षा वेगळे आहे हे जाणवले. माणूस विद्येने शहाणा होतो तितकाच अनुभवाने जाणकार होतो याचा प्रत्यय आला. काही कामे (विशेषत: सामाजिक) आपल्याकडे अचानक चालून येतात. ती आपल्या परीने पूर्ण करणे हेच त्या कामाला न्याय देण्यासारखे असते. त्याचे यशापयश आपण लोकांवर सोपवावे. आपल्याला काम केल्याचे समाधान व आनंद मिळतो. आयुष्याच्या अखेरच्या टप्प्यावर माणसाला आणखी काय हवे असते ?

## भिडे कुलप्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा !

### एप्रिल

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुहास दत्तात्रय भिडे, सातारा | १ |
| २. | सौ. सुनंदा वसंत भिडे, पुणे | १ |
| ३. | श्री. महेश मधुसुदन भिडे, अलिबाग | २ |
| ४. | सौ. पूर्वा प्रमोद देवधर, दादर | २ |
| ५. | श्रीधर रामचंद्र भिडे, चिपळूण | २ |
| ६. | सौ. अलका केशव भिडे | ६ |
| ७. | सौ. पौर्णिमा धनंजय भिडे | १३ |
| ८. | कु. भूषण गजानन भिडे, अलिबाग | १५ |
| ९. | श्री. केशव मोरेश्वर भिडे | १६ |
| १०. | श्री. रमेश रामचंद्र भिडे, डोंबिवली | १७ |
| ११. | संजय शंकर भिडे, मुंबई | १७ |
| १२. | श्री. संतोष वसंत भिडे, ठाणे | १८ |
| १३. | श्री. अरविंद श्रीपाद भिडे, पुणे | २० |
| १४. | सौ. मधुरा श्रीकांत भिडे, रोहा | २३ |
| १५. | श्री. विनायक सदाशिव भिडे, धुळे | २४ |
| १६. | चि. अथर्व विवेक भिडे, रत्नागिरी | २४ |
| १७. | श्री. धनंजय केशव भिडे | २४ |
| १८. | सौ. शर्मिला नितीन पुराणिक, पुणे | २५ |
| १९. | श्री. भास्कर प्रभाकर भिडे, पुणे | २६ |
| २०. | श्री. यशवंत रामचंद्र भिडे, कांदिवली | २७ |
| २१. | कु. अक्षत विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २२. | कु. अक्षन विवेक भिडे, दिल्ली | २८ |
| २३. | सौ. कीर्ति प्रशांत भिडे, पुणे | २८ |

### मे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरविंद नरहरी भिडे, पुणे | ३ |
| २. | सौ. वृषाली विठ्ठल भिडे, डोंबिवली | ३ |
| ३. | सौ. शुभांगी वामन भिडे, पुणे | ५ |
| ४. | श्री. आशिष अनिल भिडे, भोपाळ | ६ |
| ५. | श्री. शरद हरी भिडे, पुणे | ११ |
| ६. | श्री. राजेश शरद भिडे, पुणे | ११ |
| ७. | श्री. विश्वनाथ शंकर भिडे, बदलापूर | १३ |
| ८. | सौ. पूनम अमित भिडे, पुणे | १३ |
| ९. | कु. मैत्रेयी सुहास भिडे, पुणे | १३ |
| १०. | श्री. यज्ञेश्वर भालचंद्र भिडे, पुणे | १७ |
| ११. | सौ. अर्चना अशोक भिडे, पनवेल | १९ |
| १२. | श्री. सुभाषचंद्र नरहर भिडे, पुणे | २२ |
| १३. | कु. सदिच्छा सतीश भिडे, मुंबई | २३ |
| १४. | कु. ओम चंदन भिडे, पुणे | २४ |
| १५. | सौ. रेखा प्रकाश भिडे, डोंबिवली | २५ |
| १६. | श्री. अजय बाळकृष्ण भिडे, पुणे | २६ |
| १७. | कु. रिचा विक्रम भिडे, हैद्राबाद | २६ |
| १८. | कु. अपूर्व राजेंद्र भिडे, डोंबिवली | २७ |
| १९. | सौ. मंगला प्रदीप कुलकर्णी, भांडुप | २७ |
| २०. | श्री. संजय प्रभाकर भिडे, माणगांव | २९ |
| २१. | सौ. अनुराधा चंद्रकांत भिडे, पुणे | २९ |
| २२. | श्री. प्रवीण प्रभाकर भिडे, पुणे | २९ |
| २३. | श्री. विनयकुमार भिडे, बेंगलोर | २९ |

### जून

| | | |
|---|---|---|
| १. | सौ. वर्षा दिलीप भिडे, पुणे | १ |
| २. | सौ. उर्मिला अरविंद भिडे, पुणे | १ |
| ३. | कु. अमृता चंदन भिडे, पुणे | ५ |
| ४. | सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे | ६ |
| ५. | सौ. सुनीता विजय भिडे, ठाणे | ८ |
| ६. | सौ. रश्मी अमेय भिडे, पुणे | १२ |
| ७. | श्री. कुमार विष्णू भिडे, पुणे | १२ |
| ८. | कमल बाळकृष्ण देवधर, गिरगांव | १४ |
| ९. | कु. अश्विनी विजय भिडे, ठाणे | १९ |
| १०. | सौ. मधुमती चिंतामण भिडे, पुणे | २० |
| ११. | श्री. श्रीनिवास केशव भिडे, बेळगांव | २० |
| १२. | सौ. सुनीती विवेक भागवत, नाशिक | २१ |
| १३. | सौ. मोहिनी अविनाश भिडे, पुणे | २३ |
| १४. | सौ. निला कुमार भिडे, पुणे | २३ |
| १५. | श्री. प्रतीक संतोष भिडे, ठाणे | २६ |
| १६. | श्री. उमेश अशोक भिडे, पनवेल | २९ |
| १७. | सौ. माधवी धनंजय भिडे, खालापूर | २९ |

# २०१६ कुलसंमेलनाची दिशा

२०१४ संगमेश्वर येथील भिडे कुलसंमेलनाच्या शेवटच्या सत्रामध्ये उपस्थित भिडे बंधु, भगिनी आणि माहेरवाशीणींना भिडे प्रतिष्ठानकडून पुढील वर्षातील भिडे कुल संमेलन स्थळ ठरविण्याबाबत केलेल्या आवाहनाला उस्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला. त्याप्रमाणे नाशिक आणि चिपळूण येथील भिडे कुलोत्पन्नांनी त्याला उस्फूर्तपणे दाद देऊन प्रतिसादही दिला. त्याप्रमाणे नाशिक मधील भिडे मंडळींचा फेब्रुवारी अखेरपर्यंत काय विचार आहे तो कळेल त्याप्रमाणे पुढील वर्षाचे संमेलन स्थळ निश्चिती होईल असे ठरले. त्यानुसार नाशिक, पिंपळगाव येथील श्री. विजयसिंह भिडे, विक्रम भिडे मिळून दहा भिडे नाशिक स्थानिक मंडळींनी प्रतिष्ठानकडे कळवून नाशिक येथे संमेलन संपन्न करण्याची तयारी दर्शविणार पत्र पाठविले आहे. त्यानुसार मार्च/एप्रिल २०१५ मध्ये नाशिक भिडे मंडळींच्या बैठका झाल्यानंतर प्रतिष्ठानकडून एप्रिल अखेर नाशिक येथे एक बैठक घेऊन २०१६ च्या भिडे कुलसंमेलनाची निश्चिती, करतील असा मानस आहे. जुलै-२०१५ च्या 'आम्ही भिडे' अंकात त्यासंबंधी खुलासा करण्यात येईल. असे प्रतिष्ठान करून अधिकृतरित्या सांगण्यात आले आहे.


## यशस्वी प्रकल्पांची परंपरा

फ्री होल्ड, पूर्ण विकसित, निवासी-रेखांकन-बिनशेती,
कायदेशीर, बंगलो प्लॉटस्

www.guhagarlandprojects.com

OM ENTERPRISES



संपर्क : रविंद्र भिडे
9702782556 / 9869339543

देवदर्शन व पर्यटनासाठी निसर्गरम्य परिसरात
शाकाहारी, मद्यपानविरहीत,
सुखसोयींनी युक्त विश्रामगृह

कर्मयोग

www.karmayognatureretreat.com



पत्ता : चिपळूण-गुहागर मार्ग (गुहागरपूर्वी १५ कि. मी.),
काजळीवाडी, गिमवी, ता. गुहागर

**व्यक्तिगत आर्थिक स्थैर्याचा निकष संस्थेच्या प्रगतीसाठीही तितकाच आवश्यक असतो. संस्था आर्थिक दृष्ट्या सुदृढ व्हावी व सर्व सदस्यांच्या सहाय्याने हे उद्दिष्ट साधावे ह्या हेतूने नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा.**

## अभिनंदन !

बार कौन्सिल ऑफ महाराष्ट्र व गोवाच्या अध्यक्षपदी नाशिक येथील ॲड. अविनाश जनार्दन भिडे यांची बिनविरोध निवड झाली. ॲड. भिडे यांच्यारुपाने नाशिकला तिसऱ्यांदा हा बहुमान मिळाला आहे. ॲड. भिडे गेली २८ वर्षे वकीली करीत आहेत. फौजदारी खटल्यांशिवाय लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये चालणाऱ्या खटल्यांत ते निष्णात आहेत. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यात ते वकीली करतात. ॲड. अविनाश यांचे वडील कै. जनार्दन भिडे हे सुद्धा नामांकीत वकील होते. तसेच त्यांची मुलगीसुद्धा मुंबई उच्च न्यायालयात वकीली करीत आहे. या व्यवसायाच्या माध्यमातून समाजसेवेची संधी मिळते. या व्यवसायात आधुनिकता आणण्यासाठी वकीलांकरिता विमा योजना राज्यभर कार्यान्वित करण्यासाठी विशेष प्रयत्न करणार असेही ते म्हणतात. नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानतर्फे त्यांचे हार्दिक अभिनंदन आणि पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा !




**मी**

**एकपात्री नाट्यप्रवेश, कथाकथन आणि किर्तनाचे कार्यक्रम सादर करते.**

**...संपर्कासाठी...**

**राजश्री भानू (भिडे)**

**जाईल वाडा, यशमंगल हौसिंग सोसायटीसमोर, पनवेल.**

**मोबाईल ९३२२९५५०६३**


## कूलजला

**सौ. उर्मिला अरविंद भिडे**, पुणे
०२०-२५३९७०६१

जानेवारी, १७ व १८, २०१५ चे नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानचे संमेलन माभळे, ता. संगमेश्वर जि. रत्नागिरी येथे संपन्न झाले.

पंधरा-वीस घरांचे सोनवी नदीच्या काठावरचे डोंगर उतारावरचे एक छोटेसे सामान्य गाव. संमेलन तेथे घ्यायचे ठरले आणि मन धास्तावले! मध्यमवर्गीय गावाने हा गोवर्धन कसा उचलायचा पण विठ्ठलाचे नाव घेऊन अनेक हात पुढे सरसावले. दोन-तीन महिने अविरत श्रम करून ग्रामस्थांनी संपूर्ण कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्याचा प्रयत्न केला. गावातील दाट झाडी डोंगराळ भाग पाहुण्यांना भुरळ घालणारा होताय, पण ''दुरून डोंगर साजरे'' या उक्तीप्रमाणे प्रत्यक्ष माभळ्यात पोहोचल्यानंतर सर्वांनाच एक गोष्ट जाणवली की, गावात एक फूटभर कोठे जायचे तर पायरी चढण्या उतरण्याखेरीज पर्याय नाही. अर्थात या अडचणीला ग्रामस्थ काहीच करू शकत नव्हते. तसेच बाहेर गावाहून येणाऱ्या व्यक्तींना १६/२० कि.मी. दूर असणाऱ्या हॉटेलमधून निवास करावा लागला. त्याला ही नाईलाज होता. पण, प्रत्यक्ष समारंभ दृष्ट लागण्यासारखाच झाला. कुळीथ (हुलगा) उसळ, त्याचेच सार (कळहण), पावटे (वाल) ची उसळ, भाजणीचे वडे असे वेगळेच पदार्थ सर्वांच्याच पसंतीला उतरले. गावातील उत्सवाची झलक, ग्रामीण भागातील खेळे सर्वांनाच पसंत पडले; तसेच स्त्रियांचे हळदी-कुंकू कार्यक्रम व सहकार्य वाखाणण्यासारखे होते.

येथे एक उल्लेख करावासा वाटतो. ज्योतिबांना स्त्रियांच्या शाळेसाठी आपला वाडा देणारे भिडेच. भीमाशंकरचा जीर्णोद्धार करणारे भिडे, रायगडावर नित्य शिवरायांचे पूजन करणारे भिडेच ! भिडे कधी जात-पात मानीत नाहीत, त्यामुळेच माभळे गावात सर्व जातीचे लोक सहकार्याने जीवन जगतात. म्हणूनच आपल्या संमेलनात कुळंबी, मराठा इ. विविध जातीचे समाजातील लोकांनी खेळे (लोक नाट्याचा तेथील एक प्रकार) सादर केले. ग्रामस्थ भिडे मंडळींना आपल्या उणीवांची जाणीव होतीच; पण पाहुण्यांनी देखील नीर-क्षीर विवेक ठेऊन अडचणींकडे दुर्लक्ष करून चांगल्या गोष्टीचे भरभरून कौतुक केले आणि ग्रामस्थांना समाधान मिळवून दिले. याबद्दल धन्यवाद !

**धन्यवाद !**

**संगमेश्वर (माभळे) येथे जानेवारी २०१५ मध्ये झालेल्या भिडे कुलसंमेलनामध्ये माभळे ग्रामस्थ समस्त भिडे बंधू-भगिनी आणि माहेरवाशिणींतर्फे रु. २१,००० ची देणगी सुपुर्द केली.**

# माभळेकरांचे अगत्य

**स्नेहल विजय भिडे**, ठाणे

दगडांच्या चिऱ्यात गोड-गोड पाणी,
माभळेकर भिड्यांच्या अगत्यानं आणले,
समस्त भिड्यांच्या डोळ्यात कृतज्ञतेचे पाणी.....
आभार मानणे योग्य नाही
आपल्याच घरात आम्ही पाहणे नाही
परंतु दोन दिवसाच्या तुमच्या अगत्याने
मनात मात्र घर केले

पुन्हा पुन्हा यावे असे
कौल मनाने दिले
कोकणातला माणूस असाच असतो
गोड खोबऱ्यासाठी
करवंटीला तडा धावाच लागतो

ज्यांना हे जमतं तो यांचाच होतो
अन् आयुष्यभर ऋणाचा भागीदार होतो
अ् आयुष्यभर ऋणाचा भागीदार होतो
करीत नाही खोटे गुणगान
पण आवडला तुमचा-आमचा गाव
लक्षात ठेवून आम्हाला
परत परत येण्याचा निरोप धाडावा



# आठवणीतील गाव - अहमदनगर

- के. मो. भिडे, पुणे
मो. ९७६७२०७४०२

मनुष्य लहानाचा मोठा होतो. पुढील आयुष्यात शिक्षणाचे, नोकरीच्या अथवा सहलीच्या निमित्ताने अनेक गावांना, शहरांना भेटण्याची संधी मिळते आणि तरीही मनाच्या कोपऱ्यात एखाद्या, स्थळाचा, गावाचा, शहराचा ठसा कायमचा कोरलेला असतो. माझेही तसेच झाले. नोकरीच्या कार्यानुभवाने देश, विदेशामधील अनेक गावांना, शहरांना भेटण्याची संधी मिळाली. अनेक सुंदर शहरे मनाला भावली आणि तरीही लहानपणीच्या सुट्टीच्या काळात अहमदनगर शहरात व्यतीत केलेल्या आठवणींची गर्दी केव्हा तरी उफाळून येते आणि आनंदाचा पुनःप्रत्यय येतो.

माझा जन्म १९३८ चा. माझ्या आजोळी अहमदनगर येथे झाला. माझे आजोबा नगरच्या कोर्टात शिरस्तेदार होते. कोर्टाच्या मुख्य प्रवेशद्वाराच्या समोरच्या गल्लीत कोर्टापासून थोड्याश्या अंतरावर आजोबांचा मोठा वाडा होता. घराच्या गॅलरीत उभे राहिले म्हणजे कोर्टाचा परिसर दिसे. आजोळी एकत्र कुटुंब असल्याने बरीच माणसे होती. माझी आई भावंडांत मोठी. आजोबांची आवडती, शिवाय ताई ! त्यामुळे आम्ही भावंडे त्या काळानुसार मे महिना व दिवाळीच्या सुट्टीत आनंदाने आजोळी जात असू. हा क्रम अगदी शालांत परीक्षेपर्यंत चालू असे.

अहमदनगर तसे दुष्काळी गाव. घरोघरी आड, विहिरी असत. उघडी गटारे, अरुंद कच्चे रस्ते, टांगे, सायकलींशिवाय वाहने नसत. माझ्या आठवणीच्या काळात म्हणजे १९४२ ते १९५१ या काळात नगर तसे मागासलेले शहर होते आणि तरीही तेथे सुट्टीच्या काळात जाणे आवडे.

प्राथमिक शाळेत असेतोपर्यंत गल्लीतील समवयस्क मुलांबरोबर गोट्या, विटीदांडू, लगोरीसारखे खेळ भर रस्त्यावर खेळत असू. आम्ही राहात असू त्या टांगे गल्लीपासून नालेगाव व पुढे स्मशानापर्यंत रस्ता होता. टांगे गल्ली या नावाप्रमाणे अनेक टांगे, घोड्यांसाठी तबेले असत. गल्लीत संमिश्र वस्ती होती. घरोघरी हातमागावर काम चाले. सार्वजनिक नळावर पाणी भरण्याचे काम चाले. भाऊसाहेब (आजोबांचा दरारा होता) यांची मुले म्हणून सर्वजण ओळखत. सर्व ठिकाणी मुक्त प्रवेश असे. घरासमोर पडलेला वाडा होता. त्याच्या मागे चुन्याची घाणी व जवळ शहरातील मोठी मशीद होती. मुस्लीम समाजातील प्रेत यात्रा तेथे येत धीर-गंभीर आवाजातील चाललेली स्मशान यात्रा आली की आम्ही मुले कडेला उभे असू. काही वेळा लिंगायत समाजातील यात्रा येत. ती पाहून मात्र भिती वाटे.

प्राथमिक शाळेनंतर माध्यमिक शाळेच्या सुट्टीच्या काळात मात्र सुट्टीचा कार्यक्रम निराळा असे. कोर्टाच्या सुट्टीच्या दिवशी कोर्टाच्या आवारात खेळावयास मिळे. कोर्टाला चार दिशेला चार प्रवेशद्वारे होती. कोर्टाचे आवार प्रशस्त. मुख्य प्रवेशद्वारातून आत गेले म्हणजे मध्यभागी मुख्य इमारत. मागील प्रवेशद्वारांपैकी एका बाजूला दुबोटी चिरा या नावाने प्रसिद्ध अशी मशीद तर दुसऱ्या गेटच्या समोर स्वतंत्र सैनिक रावसाहेब अच्युतराव पटवर्धन यांचा वाडा होता. आमचे घरातून मुख्य रस्त्याला आले म्हणजे सरळ दिल्ली दरवाजा म्हणून मोठी वेस होती. त्या पलीकडे शनीचे मंदिर, सिद्धीबाग ते लहानशा टेकडीवरील लाल टाकी या नावाने प्रसिद्ध अशी पाण्याची टाकी होती. आम्ही सकाळी फिरायला या रस्त्याने जात असू. कधी सकाळी भुई कोट अशा प्रचंड किल्ल्यात जात असू. तेथे स्वतंत्र चळवळीच्या काळात काँग्रेस वर्किंग कमिटीच्या पुढाऱ्यांना येथे स्थानबद्ध केले होते. पंडित नेहरू, आझादांपासून अनेक लोकप्रिय नेते तेथे होते असे आम्हांस सांगितले जाई. चितळे रोडवरील सार्वजनिक वाचनालयामध्ये आम्ही नियमित जात असू.

अशाच आठवणी सांगत बसलो तर मोठा लेख होईल. तथापि दोन ठळक आठवणी सांगतो. आम्ही मोटारीने प्रवास करीत असू त्यावेळी जेथे सध्या पुणे महानगरपालिका आहे तेथे त्यावेळेस मोटार स्टँड होता. रेल्वेने जावयाचे तर दौंड जंक्शनपर्यंत गाडी जावयाची. त्याच्या परत उलट दिशेने श्रीगोंदे, विसापूर, सारोळा या बाजूला म्हणजे परत पुण्याच्या दिशेला आल्यासारखी वाटे आणि मौज वाटे. नगर रेल्वे स्टेशनवर उतरल्यावर ज्यांच्याजवळ फारसे सामान नसे. त्याच्यासाठी भाड्याने सायकल मिळे. ती सायकल बिल्ला दाखवून माळी वाडा स्टँडवर आणून द्यावयाची. भाडे फक्त १ आणा. (हल्लीचे ६ पैसे)

पुढे मोठा झाल्यावर सकाळचे शहर कार्यालय पगलीनगरमध्ये झाले. वृत्तपत्रे वाहून नेण्यासाठी रात्री स्पेशल मॅटॅडोर होती. सुट्टीला जोडून रात्रीच्या गाडीने मी पहाटे नगरला येई. तेथून आजोळी थांबून परत दुसऱ्या दिवशी सकाळी त्याच गाडीने पुण्याला येई.

काही वर्षांपूर्वी साप्ताहिक सकाळचा अहमदनगर जिल्हा विशेषांक प्रसिद्ध केला. त्या अंकाचे प्रकाशन नगरचे सुप्रसिद्ध कलावंत सदाशिव अमरापूरकर यांच्या हस्ते झाले. त्या वेळेस मी प्रास्ताविक केले. त्यात अहमदनगर विषयीच्या आठवणी बारीक खाणाखुणांसह भरभरून सांगितल्या. त्या ऐकून अमरापूरकरही चकित झाले. समारंभ संपल्यावर ते म्हणाले, 'भिडे तुम्ही नगरकर दिसता. मी नगरचा असूनही मला या गोष्टी माहीत नव्हत्या.'

मी म्हटले, 'मी खास पुणेरी, पण माझे आजोळ नगरचे आणि का कोणास ठाऊक, नगरचा जन्म असल्याने नगरविषयी ममत्व असावे'.

आज आयुष्याच्या संध्याकाळी या सर्व भूतकाळातील आठवणी जाग्या होतात. इतर शहरांप्रमाणे नगरचाही प्रचंड विस्तार झाला. पण तो तपशिलाचा विषय झाला. एखाद्या निवांत वेळी पूर्व स्मृती जाग्या होतात आणि आनंद देतात.

प्रत्येकाच्या आयुष्यात अशा आठवणी जपल्या असतील. शब्द रूपाने त्याही जाग्या करा. तुम्हालाही आनंद लुटता येईल.

**आभार !** - संगमेश्वर २०१५ च्या भिडे कुल संमेलनाकरिता खालील व्यावसायिकांनी आपले बॅनर्स देऊन प्रतिष्ठानला हातभार लावला. त्याकरिता प्रतिष्ठानकडून मनःपूर्वक धन्यवाद !

**❋ मे. अभिरुची, भिडे बाग, पुणे ❋ मे. सूर्यशिबिर, पुणे**
**❋ बँक ऑफ बडोदा, पुणे ❋ बिर्ला शक्ती सिमेंट**
**❋ मे. भिडे सिमेंट सप्लायर्स, संगमेश्वर ❋ राजुरी स्टील**
**❋ दीपराज पापड उद्योग**

**नम्र सूचना** - ज्या कुलबंधू-भगिनी व माहेरवाशिणींना 'आम्ही भिडे'चा अंक मिळत नाही अथवा प्रतिष्ठानकडून कोणताही पत्रव्यवहार होत नाही त्यांनी खालील क्रमांकावर संपर्क साधून आपला नावासह पत्ता, फोनक्रमांक कळवावा. तसेच अंक दोनदा मिळत असेल त्यांनी त्वरित कळवावे.

दिलीप भिडे, पुणे ९६५७५४१२३६ ले. क. सुनिल भिडे, पुणे ६२३०१७४४४
अजय भिडे, मुंबई ९९६९५४४७२४ प्रदीप भिडे, डोंबिवली ९८९२५०४०४२

## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

**पुणे कार्यालय :** ९२, शुक्रवार पेठ,
रंजन को-ऑप, हौसिंग सोसायटी,
मंडई गणपतीजवळ, पुणे ४११००२
फोन : दिलीप भिडे, मो. ९६५७५४१२३६

## • पत्रव्यवहारासाठी पत्ता •

**ले. क. सुनिल वासुदेव भिडे**
१४२६, सदाशिव पेठ, निलसदन, ए-२०१,
पुणे विद्यार्थी गृहासमोर, पुणे ४११०३०.
मो. ९६२३०१७४४४

'प्राजक्त' हे पत्र मुद्रक सौ. विनीता प्रफुल्ल डबीर यांनी प्रकाशक व मालक श्री. प्रफुल्ल गणेश डबीर यांचेसाठी प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७ 'डी' वॉर्ड, कसबा गेट-गंगावेश रोड, कोल्हापूर-४१६०१२ येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले. संपादक : प्रफुल्ल डबीर
RNI No. : M-6 (1457)/70-RNI
Reg. No. GR/RNP/KLP 136/15-17 Posted in Kolhapur RMS

साप्ताहिक प्राजक्त
२८७, 'डी'वॉर्ड, कसबा गेट
गंगावेस रोड, कोल्हापूर.
फोन नं. ०२३१-२५४०४२८७



# BHIDE & SONS PVT. LTD.

**AN ISO 9001 : 2000 COMPANY**

**Head Office :** Timber Area, Shivajinagar [N], Sangli-416 416 Mah. [INDIA] **Tel. :** +91-233-2375011 **Fax :** +91-233-2376804
**Pune Unit :** T-145, M.I.D.C Bhosari, Pune-26. **Cell. :** 9225 8181 25 **E-mail :** bhidesons@yahoo.co.in

## AGRICULTURE & GARDEN WASTE RECYCLING MACHINES

**CHIPPER SHREDDER CS-33**



Power Require : **5 to 10 H.P.**
Output Capacity : **500 Kg / hr.**
Engine Driven Model also available

**CHIPPER SHREDDER CS-50**




Power Require : **15 to 20 H.P.**
Output Capacity : **1 Tonn / hr.**
Motor Driven & Engine Driven Model also available

**CHIPPER C-80**



Power Require : **25 to 30 H.P.**
Output Capacity : **3 Tonn / hr.**
Motor Driven Model also available


**CHAFF CUTTER**



Power Require : **2 H.P./ 3 H.P. / 5 H.P.**
Output Capacity : **200 Kg / hr., 400 Kg / hr., 900 Kg / hr.**
Motor driven & Engine Driven Model also available


## INDUSTRIAL PRODUCTS

**PISTON VALVES**
**(FOR STEAM-LINE)**



**IBR & Non IBR Piston Valve**
**Class 150, Class 300 & PN 40**
**Size 15 mm to 150 mm**

**HIGH PRESSURE RECIPROCATING PUMPS (POWER PUMP)**





**Pressure - From 30 kg/cm$^2$ to 300 kg/cm$^2$**
**Application - Chemical Injection, Cleaning Drainage Pipes, Boiler feed etc.**

**CASTINGS**




Heavy C.I. Castings
Maximum single piece -
2 Tonn

**S.G.IRON FOR AUTO COMPONENTS**



Castings :
Steel, Stainless Steel & S.G. Iron
Range - From 1 kg. To 100 kg.

**LADDLE**



Foundry Crane Laddles
Capacity : Upto 20 Ton